**प्रेसनोट** **दिनांक ०५/०३/२०१९**

**दत्तवाडी पो.स्टे.पुणे**

**“तीन दुचाकी चोरणा-या दोन चोरटयांना दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद.”**

दि. ०४/०३/२०१९ रोजी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे हे स्टाफसह दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत वाहनचोरीस प्रतिबंध करण्यासाठी दत्तवाडी वन मोबाईल मधुन पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “दोन इसम विजयनगर कॉलनी एलोरा लॉजजवळ गोल सर्कलपाशी एका काळया रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीवा मोपेड गाडी क्र. एम एच १२ एल ई ६०९१ ही घेवुन संशयास्पदरित्या थांबले आहेत त्यातील एकाने त्याचे अंगात पांढरे चौकडे असणारा जांभळया रंगाचा टिशर्ट व काळी ट्रॅक पॅन्ट घातलेली असुन डोक्यावर थोडे टक्कल व रंगाने सावळा असुन दुस-याने त्याचे अंगात गुलाबी व काळया रंगाचा हाफबाहयाचा टिशर्ट निळी जीन्स पॅन्ट घातली असुन तोही रंगाने सावळा त्याचे केस वाढलेले आहेत. त्यांचेकडे असणारी ॲक्टीवा गाडी ही चोरीचीच असावी” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी ही वरिष्ठांना कळवुन त्यांचे मुफजल आदेशाप्रमाणे बरोबरील स्टाफसह तत्काळ विजयनगर कॉलनी एलोरा लॉजजवळ जावुन थोडे आडबाजुस थांबुन खात्री केली असता बातमीतील वर्णनाचे इसम हे बातमीतील वर्णनाच्या गाडीवर बसलेले त्यांना दिसले त्यामुळे खात्री झाल्याने पोलीसांनी त्यांना हटकले असता ते पोलीसांना पाहुन गाडी चालु करुन तेथुन पळुन जावु लागले परंतु पोलीसांनी त्यांना अत्यंत शिताफीने १७/४५ वा. जागीच पकडले व त्यांना आहे त्या परिस्थितीत ठेवुन त्यांना त्यांची नाव पत्ता व वाहन चालविण्याचा परवाना तसेच गाडीचे मुळ कागदपत्राबाबत विचारता त्यांनी आपली नावे १) जाकीर सलीम शेख वय. २५ वर्षे रा. सर्वे नं. १२८, हनुमाननगर, दत्तवाडी पोलीस चौकीच्या पाठीमागे पुणे व २) अतुल राजु अडागळे वय. २८ वर्षे, रा. सदर अशी असल्याची सांगीतली असुन सदरची ॲक्टीवा मोपेड दुचाकी ही त्यांनी पंधरा दिवसांपुर्वी ल. रा. शिंदे हायस्कुलच्या मागे रस्त्याचे कडेला एका मुलाने लावुन तो दुस-या गाडीवर निघुन गेल्याने त्याचाच फायदा घेवुन त्यांनी वर नमुद ॲक्टीवा गाडी चोरी करुन तिचा वापर ते फिरण्यासाठी करत आहेत असे पोलीसांना सांगीतले त्यावेळी पोलीसांनी खात्री केली असता सदर गाडी चोरीस गेलेबाबत दत्तवाडी पोलीस ठाणेस गु.र.नं. १३०/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने त्यांना दाखल गुन्हयात काल अटक केली होती. त्यानंतर त्यांचेकडे आजरोजी अधिक तपास करता त्यांनी आणखी एक हिरोहोंडा सी डी डिलक्स गाडी क्र. एम एच १२ एच क्यु २३०१ व एक बुलेट गाडी क्र. एम एच १२ एफ एच २७३५ या गाडया चोरल्या असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन सदर दोन गाडयांबाबत अनुक्रमे दत्तवाडी पोलीस ठाणे व कोथरुड पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. हवा. तानाजी निकम, पो हवा श्रीकांत शिरोळे, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो ना सोमेश्वर यादव, पो ना कुनाल माने, पो शि शरद राऊत, पो शि विकास कदम, पो शि सागर सुतकर, पो शि शिवाजी क्षीरसागर, पो. शि. राहुल ओलेकर, पो शि अमित सुर्वे, पो शि अक्षयकुमार वाबळे व पो शि अमोल लोहार यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो. स्टे. पुणे शहर